महाराष्ट्र साहित्य पत्रिकेची वाङ्मयीन वाटचाल (प्रारंभ ते १९७६)

डॉ. मिलिंद माणिकराव वाव्हळे
मराठी विभाग, मिलिंद कला महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद.

प्रस्तावना :

"नियतकालिके ही समकालीन साहित्याचा आणि त्यातील साहित्यप्रवाहाचा आरसा असतात. समकालीन साहित्याच्या सत्त्वकणांमधून वाङ्मयाची रूपे, वाङ्मयव्यवहार, वाङ्मयीन अभिरुची यांचा धांडोळा वाङ्मयीन नियतकालिके घेत असतात. कथा, कादंबरी, कविता, ललित लेखन, एकांकिका हा वाङ्मयीन ऐवज सर्व ललित अशा नियतकालिकांमधून आणि वृत्तपत्रांच्या रविवार पुरवण्यांमधूनही प्रसिद्ध होत असतो. वाङ्मयीन नियतकालिकांमध्ये समीक्षा, संशोधन, वाङ्मयव्यवहार यांचा गंभीर विचार करणारे साहित्यच प्रकाशित केले जाते."[१] या डॉ. आशा साबदेकरांच्या मताचा विचार करता, वाङ्मयीन नियतकालिकांच्या एकंदरीतच स्वरूपाविषयीचे आकलन आपल्याला होते. या नियतकालिकांच्या माध्यमातून समाजजागृती झाली, समाजपरिवर्तन घडून आले. ही नियतकालिकेच खऱ्या अर्थाने समाजसुधारणेची माध्यमे झाली हे आपल्याला नियतकालिकांचा आढावा घेतल्यास लक्षात येते.

नियतकालिकांनीच वैचारिक चळवळींना प्रेरणा दिली. त्यातूनच अनेक साहित्यिक, सामाजिक, राजकीय चळवळी आकाराला आल्या. या सर्व चळवळींमागे नियतकालिकांतून घडून आलेले परिवर्तनच आहे. नियतकालिकांचा प्रभावी उपयोगही समाजातील अनेक चळवळींनी करून घेतला आहे. याविषयी डॉ. हरिश्चंद्र निर्मळे म्हणतात की, "तलवारीपेक्षा विचाराचा आघात अधिक प्रखर असतो. तलवारीचा आघात शरीरावर, तर विचारांचा मनावर होतो. विचार समाजमनात परिवर्तन घडवून आणतो. समाजात परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर मानवी मनात विचारांची बीजे रूजविली पाहिजेत. ती रूजविण्याचे कार्य नियतकालिके अधिक समर्थपणे करीत असतात. कारण लोकमत अजमावण्याचे, त्याला जागृत करण्याचे, प्रसंगी प्रक्षुब्ध करण्याचेही सामर्थ्य नियतकालिकात असते. समाजात वैचारिक जागृती घडवून आणण्याच्या प्रमुख प्रेरणेतून नियतकालिके उदयास येत असतात. त्यामुळे समाजात जे अंत:प्रवाह वाहत असतात, त्याचे नियतकालिके ही वैचारिक अग्रदूत असतात. स्वाभाविकच, समाजातील असत्य समजुतींच्या अंध:काराचा नायनाट करून तेथे सम्यक विचारांचा प्रकाशझोत टाकणे हा नियतकालिकांचा परमधर्म बनतो."[२]

मानवी समाजाचे वैचारिक भरणपोषण करण्याचे कार्य ही नियतकालिके करत असतात. नियतकालिकांच्या माध्यमातून समाजात वैचारिक प्रबोधन घडून येते. याची प्रचिती डॉ. हरिश्चंद्र निर्मळे यांच्या वरील विधानावरून येते.

❖ **महाराष्ट्र - साहित्य पत्रिका :**

या नियतकालिकांच्या चळवळीतील एक अग्रगण्य नाव म्हणजे 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' होय. १९२८ पासून 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'चा जन्म झाला. इंग्रजांच्या काळात मराठी भाषा व मराठी साहित्य सर्वमान्य लोकांपर्यंत पोहोचविणे व साहित्यासंबंधी प्रबोधन करणे ह्या ध्येयपूर्तीसाठी मराठीत स्वत:चा इतिहास निर्माण करणारी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' जन्माला आली. १९१३ साली 'विविध ज्ञानविस्तार' च्या आधारावर 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'चा उद्‌गम झाला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मुखपत्र म्हणून निघणारे हे लहानसे मासिक आरंभी 'विविध ज्ञानविस्तार' ह्या लोकप्रिय व भारदस्त मासिकाला जोडून प्रकाशित करण्यात आले. १९२८ साली महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे पहिले संपादक म्हणून परिषदेचे कार्याध्यक्ष ना. गो. चापेकर यांनी पत्रिकेचे पहिले संपादक म्हणून कार्य केले.'[३] असे मत अनुराधा औरंगाबादकर यांनी मांडले आहे.

१९२८ ते १९७५ पर्यंत ना. गो. चापेकरांपासून ते भा. दि. फडक्यापर्यंत सुमारे पंधरा संपादकांनी पत्रिकेचे संपादन कार्य केले आहे. ते पुढीलप्रमाणे -

१) ना. गो. चापेकर : (मार्च १९२८ ते मार्च १९३३) :

या काळात त्रैमासिकाने कोणताही विषय वर्ज्य समजून नये, हा दृष्टिकोन चापेकरांचा होता. याबरोबरच सामाजिक शास्त्रांविषयीचे लेखनही या काळात पत्रिकेतून झालेले दिसते. पत्रिकेतून मनोरंजनापेक्षा ज्ञानसंवर्धन व्हावे, याकडे चापेकर कटाक्षाने लक्ष देत असत. भाषिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची माहिती व टिपणे या लेखात असत. लघुकथा व कविता या वाङ्मयप्रकारांना त्यांनी साहित्यपत्रिकेत अजिबात स्थान दिले नाही. सामाजिक विषय, मराठीचे भाषिक विशेष, निबंध, पुस्तक परीक्षणे इ. विषयी लेखनपत्रिकेत या कालखंडात झालेले आहे. लोकसाहित्यालाही या पत्रिकेतून चापेकरांनी स्थान दिलेले दिसते.

२) दत्तो वामन पोतदार : (जुलै १९३३ ते जानेवारी १९३६) :

या कालखंडात एकूण १२ अंक दत्तो वामन पोतदार यांनी प्रकाशित केले. प्रौढ व विवेचक टीका, प्रगल्भ परीक्षणे, साहित्यविषयक उलाढाल यांची माहिती अधिकारी लेखकांकडून प्रसिद्ध करावी हे प्रमुख धोरण दत्तो वामन पोतदारांचे होते. साहित्यपत्रिका ही काव्यशास्त्र विनोद पत्रिका राहू नये, असे धोरण पोतदारांनी स्वीकारले होते. कथा, कविता प्रसिद्ध करणारी अन्य मासिके आहेत. त्यांना साहित्यपत्रिकेत स्थान देण्याचे प्रयोजन नाही, असे त्यांचे धोरण होते.

पोतदारांच्या संपादन कार्यातून त्यांच्या व्यापक भाषिक दृष्टिकोनाची प्रचिती आपल्याला येते. मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या सर्व पुस्तकांची यादी प्रसिद्ध करणे, विद्वान साहित्यिकांची जीवनचरित्रे प्रसिद्ध करणे, हा प्रमुख आग्रह पोतदारांचा होता.

३) माधवराव पटवर्धन : (एप्रिल १९३६ ते एप्रिल १९३७) :

या काळात एकूण ५ अंकांचे त्यांनी संपादन केले. 'पत्रिका' हे साहित्यिक तत्त्वचर्चेचे व संशोधनांचे व्यासपीठ असावे' ही प्रमुख भूमिका माधवराव पटवर्धन यांची होती. साहित्यिक तत्त्वचर्चा आणि मनोरंजन हे त्यांच्या संपादन कार्याचे वैशिष्ट्ये आहे. 'मुंबईतील महारांची गाणी' गोपीनाथराव प्रधान यांनी संग्रहित करून पत्रिकेतून प्रसिद्ध केली आहेत. माधवराव पटवर्धन यांनी याच काळात पुस्तक परीक्षण पत्रिकेतून देताना ललित वाङ्मयीन पुस्तकांबरोबरच शास्त्रीय पुस्तकासंबधीची परीक्षणे ही दिली.

४) मो. ज्ञा. शहाणे : (जुलै १९३७ ते ऑक्टोबर १९३९) :

या कालखंडात एकूण १० अंक प्रकाशित झाले. पत्रिकेचे त्रैमासिकेतून मासिकात रूपांतर आणि त्यातून पुन्हा त्रैमासिकात रूपांतर हे स्थित्यंतर ह्या कालखंडात आपल्याला पाहायला मिळते. संशोधनात्मक, विद्वत्ताप्रचुर आणि भारदस्त अभ्यासजड लेखन महाराष्ट्र साहित्यपत्रिकेतून व्हावे, अशी आग्रही भूमिका त्यांची होती.

नभोवाणीवर मराठीला जास्ती वेळ दिला पाहिजे, नभोवाणीवर साहित्यिकांचे प्रतिनिधी असले पाहिजेत, अशी मागणी त्यांनी पुढे आणली होती. नभोवाणीवरील मराठीची हेळसांड, राष्ट्रभाषा म्हणून हिंदी सक्तीची केल्यास देशभाषेवर तिचा कोणता परिणाम होईल याविषयीचे लेखन प्रामुख्याने या कालखंडातील अंकात आले आहे. 'वाङ्मयवार्ता' व 'साहित्यिकांचे विचार' ही दोन सदरे शहाणे यांनी या कालखंडात सुरू केली होती. या कालखंडातील अंकांतून तत्कालीन विचारप्रवाहांचे व घटनांचे प्रतिबिंब पडले आहे.

५) के. नारायण काळे : (जाने १९४०- डिसें १९४२, एप्रिल १९४६ ते सप्टेंबर १९४६, जुलै १९६५ ते मार्च १९७०)

या कालखंडात एकूण ३१ अंकांचे संपादन काळे यांनी केले. पत्रिकेचा वाचक एकजिनसी नसल्यामुळे पत्रिकाही सार्वजनिक स्वरूपाची व्हावी, ही भूमिका त्यांची होती. या कालखंडात त्यांनी दुर्मिळ चित्र, छायाचित्रे व हस्ताक्षरे मिळवून ती अंकांतून प्रसिद्ध केली. त्यांच्या कालखंडात रत्नागिरी, सोलापूर साहित्य संमेलनाच्या निमित्ताने विशेषांकही काढले आहेत.

६) रा. श्री. जोग : (जाने १९४३ ते मार्च १९४६, एप्रिल १९५१ ते मार्च १९५२)

रा.श्री. जोग यांनी या काळात एकूण १५ अंकांचे संपादन केले. या काळात विचारांची व्यापकता आणि सर्वंकषता दाखविणारे साहित्य, समीक्षा धर्म, व्युत्पत्तिशास्त्र, भाषाशास्त्र, शुद्धलेखन, चित्रपट, इतिहास, वृत्तचर्चा इत्यादी विषयांवरील लेख अंकांतून प्रसिद्ध झाले. त्यासोबतच मनोरंजनात्मक ललित वाङ्मयही या काळात पत्रिकेतून प्रकाशित झाले.

रा. श्री. जोग यांनी आपल्या संपादकीय काळात आपली मते निर्भीडपणे व्यक्त केली आहेत. 'साहित्याच्या क्षेत्रातील अराजक नष्ट व्हावे म्हणून साहित्याचे नियोजन करणे त्यांना मान्य नव्हते. त्यासाठी समाजाची अभिरूचीच बदलणे महत्त्वाचे मानले.' असे स्पष्ट प्रतिपादन रा. श्री. जोगांनी केले आहे.

७) श्री. म. माटे :

रा. श्री. जोग यांच्यानंतर विद्वत्ताप्रचुर लेखांना पत्रिकेतून प्राधान्याने प्रसिद्धी देण्याचा दृष्टिकोन श्री. म. माटे यांचा होता. माटे यांचा हा दृष्टिकोन मार्च १९४७ मधील अक ३-४ (जोड अंक) वरून दिसतो. १९४६ मधील वाङ्मयीन घडामोडींचे समालोचन या अंकात केले आहे.

८) य. दि. पेंढरकर : (एप्रिल १९४७ ते एप्रिल १९५०)

य. दि. पेंढरकरांनी एकूण १३ अंकाचे संपादन केले आहे. या काळात पत्रिकेत रमणीयता आलेली दिसते. रमणीयतेच्या दृष्टिकोनातून कुसुमाग्रज, कांत, निकुंब, बोरकर इत्यादींच्या कवितांचा या अंकांत समावेश केलेला दिसतो. त्याचबरोबर लीपि सुधारणाविषयक लेखही या कालखंडातील अंकात आलेले दिसतात.

९) रा. शं. वाळिंबे : (जुलै १९५० ते मार्च १९५१)

रा. शं. वाळिंबे यांनी ३ अंकांचे संपादन या काळात केले. या काळात विचारगर्भ लेखन, भारदस्त व तात्त्विक निबंध आणि शास्त्रीय संशोधन यांच्यावर प्रामुख्याने भर दिलेला दिसतो. या कालखंडातील डॉ. के. ना. वाटवे यांचा संस्कृत व पाश्चात्य वाङ्मयाच्या आधारे लिहिलेला 'संवेदन' हा लेख विशेष उल्लेखनीय आहे.

१०) वि. भि. कोलते : (एप्रिल १९५२ ते मार्च १९५५)

वि. भि. कोलते यांनी आपल्या काळात एकूण १५ अंकांचे प्रकाशन केले. या काळातील अंक पाहता, मराठी भाषा व मराठी वाङ्मय यांचा संबध बहुजन समाजाची भाषा व साहित्य यांच्याशी लावणे हे महत्त्वाचे आहे, असे मत वि. भि. कोलते यांचे होते असे दिसते. याच काळात ग्रंथ परीक्षणे, संशोधनात्मक लेख व समीक्षा यांच्याबरोबर कथा, कविता व लघुनिबंध यांना पत्रिकेतून प्रसिद्धी दिलेली दिसते.

११) वा. रा. ढवळे : (एप्रिल १९५५ ते १९६१, एप्रिल १९६३ ते डिसेंबर १९६३)

ढवळे यांनी या काळात एकूण २५ अंकांचे संपादन केले. 'वाङ्मयाचे निर्भीड, मार्मिक व अचूक मूल्यमापन पत्रिकेने करावे', या भूमिकेतून त्यांनी अंकांचे संपादन केले. पत्रिकेतून प्राचीन व अर्वाचीन साहित्यविचार, समीक्षा व संशोधन या विषयांबरोबर कला सौंदर्यालाही प्रसिद्धी देण्यात आली. यांच्या काळात कथा, कविता व लघुनिबंधाला येथे स्थानच नव्हते. मराठी वाङमयाच्या दृष्टिने अनेक उपक्रम त्यांनी राबविले.

१२) दि. के. बेडेकर : (एप्रिल १९६१ ते एप्रिल १९६३)

या काळात एकूण आठ अंकांचे संपादन त्यांनी केले. 'साहित्य समीक्षा' या सदरात तत्कालीन साहित्याचा परामर्श त्यांनी घेतला आहे. त्याचबरोबर भारतीय भाषांमधील साहित्याची ओळखही त्यांनी करून दिली आहे.

१३) श्री. के. क्षीरसागर : (जानेवारी १९६४ ते एप्रिल १९६३)

या काळात ५ अंकांचे संपादन त्यांनी केले. भाषाशुद्धीच्या निमित्ताने, शुद्ध कला प्रेरणेचे रूप, सौभद्रच्या निमित्ताने इ. असे काही वैचारिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण लेख या काळात प्रकाशित झालेले दिसतात.

१४) स. गं. मालशे : (एप्रिल १९७० ते मार्च १९७३)

या काळात १३ अंक प्रकाशित करण्यात आले. या कालखंडातील अंकातून तत्कालीन साहित्य, कला व संस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले दिसते. याच काळात त्यांनी महनीय व्यक्तींच्या जन्मशताब्दी निमित्ताने प्रसिद्ध केलेल्या लेखांतून त्यांच्यातील संपादकीय गुणांची ओळख आपल्याला होते.

१५) भालचंद्र फडके : (एप्रिल १९७३ ते मार्च १९७६)

या काळात फडके यांनी एकूण आठ अंकाचे संपादन केले. पत्रिकेच्या वाटचालीपासून पत्रिकेत विविध विषयावरील लेख तर प्रसिद्ध झालेच, परंतु भालचंद्र फडके यांनी आपल्या कालखंडात विविध वाङ्मयीन प्रवाह पत्रिकेतून व्यक्त झाले पाहिजे यावर कटाक्षाने लक्ष दिले. फडके यांनी 'राजकवी तांबे विशेषांक' व 'श्री ज्ञानदेव विशेषांक' काढले. याच काळात विविध वाङ्मयीन प्रवाहांची नोंद फडके यांनी घेतली.

सारांश :

१९२८ ते १९७६ या काळातील पत्रिकेच्या अंकातून समीक्षा व संशोधन ही दोन क्षेत्रे पत्रिकेने आपली कार्यक्षेत्रे म्हणून निवडली. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या या कार्याचा साक्षेपी आढावा अनुराधा औरंगाबादकर यांच्या मते पुढीलप्रमाणे, "वाङ्मयीन विचारप्रवाहाचे दर्शन घडवावे आणि जरूर तेथे त्या प्रवाहांना योग्य ते वळण लावावे हे दोन हेतू पत्रिकेच्या संपादकांनी आपल्यासमोर ठेवले. लाभालाभाची, रागलोभाची किंवा हर्षामर्षाची फिकीर न बाळगता सारेच संपादक सतत प्रयत्नशील राहिले. साहित्य पत्रिकेस जनमानसात आज लाभलेली प्रतिष्ठा ही या पूर्वसुरींच्या निरलस सेवाधर्माची आणि उज्ज्वल वाङ्मयोपासनेची फलश्रुती आहे."

अनुराधा औरंगाबादकर या मताचा विचार करता, महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे हे वाङ्मयीन कार्य साहित्य, समाज आणि संस्कतीच्या क्षेत्रात नक्कीच उल्लेखनीय आहे.

संदर्भ :

१) ललित - ऑक्टो- नोव्हेंबर - २००३, पृ. १००

२) महाराष्ट्र साहित्य पत्रिका, दिवाळी विशेषांक, १९८७

३) महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जाने-मार्च, १९७७, एप्रिल-जून १९७७